ePaper
# जमीन घोटाळा प्रकरणात पार्थ पवार यांना मोठा दणका!
वर्ष - 9 । अंक -75 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™

## आतील पानांत
- कानामागून आला आणि हिरो झाला
- प्रतिका रावळसाठी ICC चा नियम बदलला!
- बँकेतही पैसे सुरक्षित नाहीत?
- शांभवी चौधरींनी दोन वेळा मतदान केलं?

www.mahaenews.com | शनिवार, दि. 8 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

उत्तर भारतात धूसर वाऱ्यांची शक्यता | दक्षिण भारतात मुसळधार पावसाचा इशारा

# राज्यासह देशभरात थंडी वाढतेय!

## ८–९ नोव्हेंबरला मोठ्या वादळाची शक्यता; पुढील २४ तासांसाठी इशारा

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

मागील काही दिवसांपासून राज्यासह देशात सतत हवामानात मोठा बदल होताना दिसतोय. आता थंडीची चाहूल लागतंय. सकाळच्या वेळी हिवाळा जाणू लागत आहे. त्यामध्येच आता भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा दिला. 8 आणि 9 नोव्हेंबरला मोठे वादळ, अलर्ट जारी, मोठा इशारा, पुढील 24 तास... राज्यात थंडीची चाहून लागल्याचे बघायला मिळतंय. पहाटे थंडी जाणू लागली आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा थंडी उशीरा सुरू झाली. ऐन दिवाळीमध्ये पाऊस कोसळत असल्याने थंडी नव्हती. मात्र, गेल्या दोन ते तीन दिवसांपासून थंडी जाणवत आहे. असे असले तरीही भारतीय हवामान विभागाने पावसाचा अंदाज दिला. राज्यात मागील काही दिवसांपासून सतत पाऊस सुरू आहे. मॉन्सून राज्यातून गेलेला असताना मोंथा चक्रीवादळ दाखल झाल्याने अनेक भागात जोरदार पाऊस झाला. राज्यात पावसाने थैमान घातले. पिकासह शेतातील मातीही शेतकऱ्यांची वाहून गेली. मोंथा चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश बसला. राज्यात पुढील काही दिवस पावसाचे ढग असणार असल्याचा अंदाज आहे.



### नागरिकांनी सज्ज व्हावे – घराबाहेर पडण्यापूर्वी माहिती तपासा
देशभरात हवामान बदललेले दिसून येत आहे. शरद ऋतुचा आरंभ झाला असून सकाळच्या वेळी थंडीची चाहूल वाढली आहे. या पार्श्वभूमीवर (IMD) ने पुढील २४ ते ४८ तासांसाठी मोठ्या बदलावाचा इशारा जारी केलाय.

### थंडीची चाहूल, तापमानात बदल
मागील काही दिवसांत उत्तर भारत, मध्य भारत यांमध्ये न्यूनतम तापमानात २–३ °C इतकी घसरण होण्याची शक्यता आहे. अनेक भागात थंडीचा अनुभव वाढला आहे. दिवसांमध्ये अपेक्षेप्रमाणे तापमान न वाढणे, तर सकाळ-संध्याकाळी थंडी जाणवणे सामान्य झाले आहे.

### पावसाचा आणि वादळाचा इशारा
दक्षिण भारतातील काही भागांमध्ये – विशेषतः Kerala आणि Tamil Nadu मध्ये ८ ते १० नोव्हेंबर दरम्यान मुसळधार पावसाचा इशारा आहे. पश्चिम भारतात – विशेष म्हणजे कोकण, गोवा व मध्य महाराष्ट्र भागात वीज सह वादळ, विजेची कडकडाट आणि वाऱ्याची वेग वाढण्याची शक्यता आहे.
अन्य भागांमध्ये काही विभागांत धूसर वातावरण, स्मॉग किंवा फॉगसारखा अनुभव होऊ शकतो.

## भारतीय हवामान विभागाचा या राज्यांना मोठा इशारा

भारतीय हवामान विभागाने हरियाणा, पंजाब, राजस्थान, दिल्ली, बिहार आणि उत्तर प्रदेश भागात पर्वतीय वाऱ्यांमुळे थंडी वाढण्याचे संकेत दिले आहेत. आयएमडीच्या मते, शनिवार आणि रविवारपर्यंत थंडी अधिक वाढेल. पुढील 24 तासात तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, अंदमान आणि निकोबार बेटांवर वादळासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. थोडक्यात काय तर पावसाचे ढग अजूनही गेली नाहीत.

### महाराष्ट्रसह राज्यातील स्थिती & सावधानता
महाराष्ट्रसह अनेक राज्यांत पाऊस आणि वाऱ्याचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. यामध्ये गाव-शहर, खेडी-वाटी दोन्ही प्रभावित होऊ शकतात.

### जुन्या पिकांना, मातीच्या गळतीला गंभीर धोका
वाहतूक आणि वाहतुकीसाठी धोकादायक वेळ येऊ शकतो – उदा. गडद ढग, विजेची कडकडाट, वारा.
घराच्या आजूबाजूचे झाड, नळ जोडीची स्थिती तपासा – वारा वाढल्यास त्यांचे दुष्परिणाम होऊ शकतात.

### पुढील २४ तासांची ऋतू-दृष्टी
थंडीचे प्रमाण वाढेल, विशेषतः रात्री-सकाळी ऋतुमान कमी राहण्याची शक्यता.
काही भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस, तर दक्षिणेच्या किनाऱ्यांवर तीव्र पावसाची शक्यता वर्तवली आहे.
वारा वेगवान होऊ शकतो; लहान झाडांकडे, ओव्हरहेड वायरकडे दुर्लक्ष करू नका.

### नागरिकांसाठी सावधानता उपाय
अचानक बदलत्या हवामानाबाबत नियमितपणे स्थानिक हवामान अपडेट्स तपासा.
घराबाहेर पडताना हलक्या पण उबदार कपड्यांचा वापर करा.
पावसाचे उपकरणे, छत्री, वाजविण्यायोग्य वस्त्र सोबत ठेवा.
वारा जास्त असेल तर झाडाखाली, लड़कीच्या किंवा तारांच्या जवळ थांबणे टाळा.
पावसात ड्रायव्हिंग करताना विजेच्या सह वाऱ्याच्या वेगावर लक्ष ठेवा.
गरज वाटल्यास आपला परिसर, शेजारी लोक मदद मिळविण्यास सज्ज रहा.

## जमीन खरेदीचा व्यवहार रद्द

## पवारांच्या कंपनीला मुद्रांक शुल्कचा दणका

# एवढी रक्कम भरा, मगच व्यवहार रद्द!

## तीनशे कोटी रुपयांना विकत घेतली



।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**'उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ यांच्या अमेडिया कंपनीने केलेला व्यवहार रद्द करण्यासंदर्भात संबंधित पक्षकार नोंदणी आणि मुद्रांक विभागात दाखल झाले. मात्र, जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्क आणि व्यवहार रद्द करायचा झाल्यास नियमानुसार आणखी तेवढीच रक्कम भरावी लागणार आहे. त्यानंतरच हा व्यवहार रद्द होणार आहे,' असे मुद्रांक शुल्क विभागाकडून सांगण्यात आले. त्यामुळे हा व्यवहार शुक्रवारी रद्द होऊ शकला नसल्याची माहिती नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून देण्यात आली.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने मुंढवा परिसरातील महार वतनाची सुमारे ४० एकर जागा तीनशे कोटी रुपयांना विकत घेतली. कायद्यानुसार महार वतनाची जागा सरकारच्या परवानगीशिवाय विकता येत नाही. तसेच, ती हस्तांतरित किंवा गहाणही ठेवता येत नाही. मात्र, ४० एकरांचा हा भूखंड पार्थ यांच्या कंपनीने घेतला असून, जमीन व्यवहाराची किंमत कमी दाखवून मुद्रांक शुल्कही बुडविण्यात आल्याचा आरोप आहे.पार्थ पवार यांच्या कंपनीच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी पक्षकार सहदुय्यम निबंधक कार्यालयात दाखल झाले. त्या वेळी व्यवहार रद्द करण्यात येत असल्यामुळे २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्कमाफीचे प्रयोजनही आपोआप संपुष्टात आले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे हे २१ कोटी आणि व्यवहार रद्द करण्यात येत असल्याने नियमानुसार आणखी तेवढीच रक्कम व इतर अधिभार, असे एकूण ४३ कोटींचे मुद्रांक शुल्क कंपनीला भरावे लागणार असल्याची माहिती नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, या संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या सहनोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सखोल चौकशीला प्रारंभ केला आहे. ही समिती सात दिवसांमध्ये त्यांचा अहवाल राज्य शासनाला सादर करणार आहे. दस्त नोंदणीमध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत किंवा कसे, याबाबतची तपासणी केली जाणार आहे.तसेच, या संदर्भात गुरुवारी प्रभारी नोंदणी महानिरीक्षक डॉ. सुहास दिवसे यांनी राज्य शासनाला दिलेल्या अहवालात सरकारची फसवणूक केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे मुठे समितीकडून त्या संदर्भातील तपासही होणार असून, त्याबाबत समितीच्या बैठकीत प्राथमिक चर्चा करण्यात आली.मुंढवा येथील ४० एकर भूखंड व्यवहार रद्द करण्यासंदर्भात शुक्रवारी पक्षकार दाखल झाले. मात्र, त्यांना मुद्रांक शुल्काची संपूर्ण रक्कम भरण्याची सूचना करण्यात आली. रक्कम जमा झाल्यानंतरच व्यवहार रद्द होण्याची प्रक्रिया पूर्ण होईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने मुंढवा परिसरातील महार वतनाची सुमारे ४० एकर जागा तीनशे कोटी रुपयांना विकत घेतली. कायद्यानुसार महार वतनाची जागा सरकारच्या परवानगीशिवाय विकता येत नाही. तसेच, ती हस्तांतरित किंवा गहाणही ठेवता येत नाही. मात्र, ४० एकरांचा हा भूखंड पार्थ यांच्या कंपनीने घेतला असून, जमीन व्यवहाराची किंमत कमी दाखवून मुद्रांक शुल्कही बुडविण्यात आल्याचा आरोप आहे.पार्थ पवार यांच्या कंपनीच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी पक्षकार सहदुय्यम निबंधक कार्यालयात दाखल झाले. त्या वेळी व्यवहार रद्द करण्यात येत असल्यामुळे २१ कोटी रुपये मुद्रांक शुल्कमाफीचे प्रयोजनही आपोआप संपुष्टात आले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आकोटींचे मुद्रांक शुल्क कंपनीला भरावे लागणार असल्याची माहिती नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.दरम्यान, या संदर्भात स्थापन करण्यात आले

### त्या संदर्भातील तपासही होणार

समितीने सखोल चौकशीला प्रारंभ केला आहे. ही समिती सात दिवसांमध्ये त्यांचा अहवाल राज्य शासनाला सादर करणार आहे. दस्त नोंदणीमध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत किंवा कसे, याबाबतची तपासणी केली जाणार आहे.तसेच, या संदर्भात गुरुवारी प्रभारी नोंदणी महानिरीक्षक डॉ. सुहास दिवसे यांनी राज्य शासनाला दिलेल्या अहवालात सरकारची फसवणूक केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे मुठे समितीकडून त्या संदर्भातील तपासही होणार.

# कुठलाच भ्रष्टाचार सहन करत नाही

## अजित पवारांच्या सहभागावर चंद्रकांत पाटील स्पष्टच बोलले



। पुणे ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पार्थ पवार जमीन गैरव्यवहार प्रकरणी महत्वाचं विधान केले आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते. "कुठल्याही निष्कर्षावर पोहचणे बरोबर नाही. पार्थ पवार एकटे कसे अजित पवारांचा यात सहभागी असेल. हे सर्व काही तपासांती समोर येईल."अस चंद्रकांत पाटील यांनी अधोरेखित केले आहे.**

पुण्यातील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच नाव घेतलं जातं आहे. परंतु, अद्याप त्यांच्यावर गुन्हा दाखल नाही. कोंढवा येथील ४० एकर जमीन कवडीमोल भावात पार्थ पवार यांची भागीदारी असलेल्या अमेडिया कंपनीने घेतली आहे. यावरून आता राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मत व्यक केलं आहे. ते म्हणाले, "राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुठलाच भ्रष्टाचार सहन करत नाहीत. या प्रकरणात तात्काळ तहसीलदार यांना निलंबित केलं आहे.

आ य . जी द र्जा चे अधिकाऱ्याची याप्रकरणी चौकशीसाठी नेमले आहे. त्यामुळं आताच पार्थ पवार यांचा आणि त्यांच्या कंपनीचा सहभाग आहे, किंवा पार्थ पवार एकटेच कसे अजित पवारांचा सहभाग असेल. या निष्कर्षावर येणं बरोबर नाही. चौकशीअंती सगळं समोर येईल. याचा आणि महानगर पालिकेचा काहीही संबंध नाही. अस स्पष्टपणे चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते.राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पार्थ पवार जमीन गैरव्यवहार प्रकरणी महत्वाचं विधान केले आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते. "कुठल्याही निष्कर्षावर पोहचणे बरोबर नाही.

### पार्थ पवार यांच नाव

हे सर्व काही तपासांती समोर येईल."अस चंद्रकांत पाटील यांनी अधोरेखित केले आहे. पुण्यातील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच नाव घेतलं जातं आहे. परंतु, अद्याप त्यांच्यावर गुन्हा दाखल नाही. कोंढवा येथील ४० एकर जमीन कवडीमोल भावात पार्थ पवार यांची भागीदारी असलेल्या अमेडिया कंपनीने घेतली आहे. यावरून आता राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मत व्यक केलं आहे. ते म्हणाले, "राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कुठलाच भ्रष्टाचार सहन करत नाहीत.

## कर संकलन विभागाची जनजागृती

### ऑनलाईन प्रणालीमुळे मोठ्या प्रमाणात

# मालमत्ताधारकांनी भरला ऑनलाईन कर!

## ६३१ कोटी ६६ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने राबविलेल्या विविध जनजागृती उपक्रमांमुळे आणि सुलभ ऑनलाईन प्रणालीमुळे नागरिक आता मोठ्या प्रमाणात ऑनलाईन माध्यमातून मालमत्ता कर भरण्याकडे वळले आहेत. चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत शहरातील ७ लाख ४० हजार मालमत्ताधारकांपैकी ४ लाख ७७ हजार २८४ मालमत्ताधारकांनी कर भरला असून, त्यापैकी ३ लाख ९३ हजार ७७१ मालमत्ताधारकांनी ऑनलाईन माध्यमातून कर भरला आहे.**




गेल्या काही वर्षापासून महापालिकेने कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'ऑनलाईन कर भरा' या मोहिमेखाली नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. यामध्ये विशेष सवलतींची घोषणा, एसएमएस, सोशल मीडिया, स्थानिक चौकांवर सार्वजनिक घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांचा परिणाम म्हणून नागरिकांनी प्रत्यक्ष कर कार्यालयात जाण्यापेक्षा ऑनलाईन माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर केला.

महापालिकेने मालमत्ता कर भरण्यासाठी अधिकृत वेबसाइट उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या मालमत्तेची माहिती, थकबाकी रक्कम, पावती डाउनलोड तसेच सवलतींचा तपशील एकाच ठिकाणी पाहता येतो. सुरक्षित पेमेंट आणि सुलभ वापरामुळे नागरिकांचा या डिजिटल माध्यमावर विश्वास वाढला आहे.

> पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक डिजिटल साधनांचा उत्तम वापर करत आहेत. ऑनलाईन पेमेंट प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली आहे आणि कर संकलन प्रक्रियेत वेग आला आहे. येत्या काळात अधिक सुविधा समाविष्ट करून ही प्रणाली अजून सुलभ करण्याचा प्रयत्न सुरू आहे.
> —**पंकज पाटील,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### ६३१ कोटी ६६ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल

पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत १ एप्रिल २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या काळात ६३१ कोटी ६६ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. यामध्ये ऑनलाईन माध्यमातून जमा झालेल्या कराची रक्कम तब्बल ५१५ कोटी रुपये आहे.

**असा झाला भरणा**

ऑनलाईन – ५१५ कोटी
रोख – ४३ कोटी २० लाख
धनादेश – ३८ कोटी ६६ लाख
डिमांड ड्राफ्ट – १ कोटी ८९ लाख
ईडीसी – ६ लाख

## 'अचिव्हर्स डायलॉग्स पुणे एडिशन' चे आयोजन

### शिक्षण विश्व: यूके मधील नामांकित विद्यापीठांचा सहभाग

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे भारत आणि युनायटेड किंगडम शैक्षणिक संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने, नॅशनल इंडियन स्टुडंट्स अँड अल्युमनी युनियन, यूके (एनआयएसएयू) आणि पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) यांच्या संयुक्त विद्यमाने 'अचिव्हर्स डायलॉग्स – पुणे एडिशन' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात जगातील नामांकित विद्यापीठे, शिक्षणतज्ज्ञ आणि यूके मधील भारतीय माजी विद्यार्थी पीसीयू च्या विद्यार्थ्यांना ब्रिटनमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन करणार आहेत.**




या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना व शैक्षणिक व्यावसायिकांना यूके मध्ये शिक्षण घेण्यासाठी आवश्यक अशी माहिती, मार्गदर्शन आणि अनुभव उपलब्ध ऐकायला मिळतील. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, शिष्यवृत्ती, इंटर्नशिप, कॅम्पस जीवन, विद्यार्थ्यांचे अनुभव, आर्थिक नियोजन, निवास व्यवस्था आणि इंग्रजी भाषेची आवश्यकता या सर्व विषयांवर थेट यूके विद्यापीठांचे प्रतिनिधी आणि भारतीय माजी विद्यार्थी माहिती देणार आहेत.

अचिव्हर्स डायलॉग्स' हा एनआयएसएयू आणि ब्रिटिश कौन्सिल इंडियाच्या सहकार्याने राबविण्यात येणारा बहु उपयोगी महत्त्वपूर्ण उपक्रम आहे, जो यूके विद्यापीठांतून शिक्षण घेतलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा गौरव करतो, तसेच भारत व यूके शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंधांना प्रोत्साहन देतो. या उपक्रमा द्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, संस्थात्मक भागीदारी निर्माण व्हावी आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण संधींना चालना मिळावी हा हेतू आहे.

कार्यशाळा, प्रदर्शन आणि चर्चासत्र द्वारे रोजगार क्षमता, जागतिक शैक्षणिक मानके आणि आंतरराष्ट्रीय शिक्षणातील संधींवर विशेष भर दिला जातो.

इम्पीरियल कॉलेज लंडन, युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन, किंग्स कॉलेज लंडन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ साऊथॅम्प्टन, युनिव्हर्सिटी ऑफ ग्लासगो, युनिव्हर्सिटी ऑफ सेंट अँड्रयूज, युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट लंडन, स्वान्सी युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ स्ट्रॅथक्लाइड, युनिव्हर्सिटी ऑफ लीसेस्टर, युनिव्हर्सिटी ऑफ हर्टफर्डशायर, युनिव्हर्सिटी ऑफ एसेक्स, ब्रुनेल युनिव्हर्सिटी आणि युनिव्हर्सिटी ऑफ वूल्व्हरहॅम्प्टन आदी प्रतिष्ठित यूके विद्यापीठांचे प्रतिनिधी कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे विश्वस्त व पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पी सी टी चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, खजिनदार शांताराम गराडे, सचिव विठ्ठल काळभोर, पीसीयू व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीयू आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. शंकर देवसारकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.




**शिक्षण दिले तर देशाचे भवितव्य घडू शकेल यावर विश्वास ठेवून त्यांनी आपल्या कामाचा पसारा उभा केला आहे. माधव साठे या माणसाबद्दल मला तुम्हाला सांगायचं आहे कारण आपल्या देशाला त्याच्यासारख्या स्त्रीपुरुषांची जास्त गरज आहे. माधव एक डॉक्टर आहेत, भूलतज्ज्ञ आहेत. गरजू लोकांच्या व्यथांमुळे ते अस्वस्थ होतात आणि त्यांच्यासाठी काहीतरी करू बघतात.**

# जग बदलण्याचे स्वप्न



या एका पैलूमुळेच ते इतरांपेक्षा वेगळे ठरतात.ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांमध्ये त्यांना सध्या रस आहे. महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील राजगुरुनगरमध्ये दुर्गम भागात असलेल्या ९० खेड्यांमधील मुख्यत: आदिवासी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकांचे जीवन माधव साठे यांनी एकहाती बदलून टाकले आहे. त्यांच्या एकट्याच्या अथक परिश्रमाचा फायदा राजगुरुनगर आणि आसपासच्या जिल्हा परिषदेच्या ४९ आदिवासी शाळा, ७३ हायस्कूल आणि ४६८ प्राथमिक शाळांमधील ४३ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि १२०० शिक्षकांना झाला आहे.माधव साठे त्यांच्या डॉक्टर पत्नी आणि मुलीसह मुंबईत राहतात. आठवड्यातून पाच दिवस ते त्यांच्या शस्त्रक्रियांमध्ये व्यग्र असतात. आठवड्याच्या शेवटी ते राजगुरुनगरला जातात. ते कारने मुंबईहून तीन तासांच्या अंतरावर आहे. तिथे ते जे काम करतात, त्यामुळे ध्येयवेडा माणूस अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे. गावकरी, मुले आणि अर्थातच साठे यांच्या या निस्वार्थ सेवेत झोकून देणारे शिक्षक माधव साठे यांची आतुरतेने वाट पाहत असतात. त्यांनी राजगुरुनगरमध्ये काम करायला सुरुवात केली तेव्हा मी आणि माझी पत्नी राजगुरुनगरला वर्षातून दोनदा तरी भेट द्यायचोच. गेली २५ वर्षे मी बॉम्बे मदर्स अँड चिल्ड्रन वेलफेअर सोसायटीचा अध्यक्ष आहे. माधव साठे तर वैद्यकीय महाविद्यालयातून पदवीधर झाल्यापासून म्हणजे ४० किंवा त्याहून अधिक काळ या संस्थेचे सचिव आहेत. मी सरकारी नोकरीतील निवृत्तीनंतर मुंबईत स्थायिक झालो, तेव्हा भारतीय पोलीस सेवेतील माझ्या एका तरुण सहकाऱ्यासह माधव साठे मला भेटायला आले आणि त्यांनी मला सोसायटीचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. त्यानुसार मी ते स्वीकारले. त्यावेळी बॉम्बे मदर्स ॲण्ड चिल्ड्रन्स वेल्फेअर सोसायटी मुंबई शहरात गरजवंतांसाठी दोन रुग्णालये आणि नोकरी करणाऱ्या मातांच्या मुलांसाठी तीन पाळणाघरे चालवत होती. माधव यांनी त्यांच्या या दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवली. मुंबईबाहेरचे दोन उपक्रम राजगुरुनगर आणि भिलवडी येथे होते तिथे सोसायटीने छोटी ग्रामीण रुग्णालये उभारली होती. बॉम्बे मदर्स ॲण्ड चिल्ड्रन्स वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक डॉ. टिळक आणि म्हसकर यांचे अनेक वर्षांपूर्वी निधन झाले होते. माधव या संस्थेचे व्यवहार एकहाती आणि अत्यंत मनापासून आणि प्रामाणिकपणे करत होते. त्यांना संस्थेला स्वावलंबी करायचे होते. त्यांना अधूनमधून सरकार आणि महापालिका अधिकाऱ्यांकडून काही मदत हवी असायची. अध्यक्ष या नात्याने मी ती मिळवून द्यायचो. राजगुरुनगर येथील रुग्णालयाने माधव यांना दुर्बल आणि गरजूंच्या सेवेसाठी स्प्रिंग बोर्ड उपलब्ध करून दिला. सार्वजनिक सेवेसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यातील डॉ. बानू कोयाजी यांनी माधव यांना राजगुरुनगरमधील आरोग्य प्रकल्पावर काम करण्यासाठी भरीव रक्कम देऊ केली. त्यांनी दिलेले पैसे संपल्यावर माधव यांनी निधीसाठी त्यांच्या डॉक्टर मित्रांशी संपर्क साधला. माधव यांच्या सामाजिक कार्यासाठीच्या तळमळीबद्दल माहिती असलेल्या त्यांच्या मित्रांनी कोणताही किंतु न ठेवता तो दिला.माधव राजगुरुनगरच्या जवळपास ९० गावांच्या उन्नतीमध्ये पूर्णपणे बुडून गेले आहेत. त्यांनी प्रामुख्याने त्या भागातील मुला-मुलींच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे चेअरमन आणि चेअरमनच्या पत्नी माला रामदुराई यांनी संगणक उपलब्ध करून दिले आहेत. त्याचबरोबर १० वर्षांच्या कालावधीसाठी ६०० जिल्हा परिषद शाळांना ई-लर्निंग देखील उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी ते वरदानच आहे. या परिसरात वाय-फाय कनेक्टिव्हिटी नव्हती. विद्युत पुरवठा सतत खंडीत होत असे. पण माधव खचले नाहीत.

## प्रासंगिक »

# जाते जिवानिशी

***त्याबद्दल ज्याचे नाव लिहिले गेले तो उपनिरीक्षक नुकताच बडतर्फ झाला. पण व्यवस्थेला लागलेल्या सरंजामी ग्रहणाचे काय?***

एकतर कोणावर अन्याय होऊच नये, झालाच तर त्याची चौकशी निष्पक्षपणे व्हायला हवी. यासाठी व्यवस्थेत पारदर्शीपणा हवा. पण अलीकडे त्याचीच नेमकी बोंब. या पारदर्शकतेच्या अभावामुळे काय उत्पात घडतो हे साखर कारखान्यांनी वेढलेल्या फलटणच्या सरकारी रुग्णालयातीलअशी कोणतीही घटना उघडकीस आली की आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडत त्यास राजकीय वळण देणे वा त्या माध्यमातून राजकीय वैराचे हिशेब चुकते करणे. याचाही प्रत्यय येथे येतो. ही आत्महत्या घडून काही आठवडे लोटले तरी त्यावरून जे सुरू आहे ते प्रगत म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रास शोभणारे नाही. यात अधिक दुर्दैव हे की समाजात यावर साधी चर्चाही घडताना दिसत नाही. अर्थात कोठे, कोणास, कोणा जातीच्या व्यक्तीने कोणा जातीच्या व्यक्तीचा बळी घेतला यावर चर्चा होणार की नाही, हे ठरते.

**वर्ष होते १९७१! सागरी आणि जमिनीवरील पर्यावरणातील पाणथळ प्रदेशांचे महत्त्व जगभरातील धोरणकर्त्यांपुढे मांडणे आणि या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील भागांना संरक्षण मिळवून देणे हा या परिषदेचा हेतू होता.**

# पाणथळींच्या रक्षणाचे भान कधी येणार?

पुढे दरवर्षी २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक पाणथळ जागा दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.पाणथळ प्रदेश म्हणजे नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या जागा. त्यामध्ये कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्सशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो. भूगर्भातील पाणी वर्षागणिक अधिकाधिक प्रमाणात उपसले जाऊ लागले आहे. अशा रित्या होणाऱ्या भूजलसाठ्यांचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात.अनेक जलस्रोतांच्या किनारी राडारोडा टाकला जातो, जलाशयांत घातक सांडपाणी सोडले जाते. पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पतीच असे दूषित घटक गाळण्याचे काम करून पाणी शुद्ध करतात. उदा. कोलकात्यातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या दूषित पाण्याचा काही भाग शुद्ध करण्यासाठी जवळच्या पाणथळ प्रदेशाचा वापर



केला जातो. भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी यादेखील पाणथळ जागाच असल्याने त्यांमधून जगभरातील ३ अब्ज लोकांना दररोजचे अन्न- भात आणि मासे मिळतात. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवतयुक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांमुळे होणारी किनाऱ्यांची धूप थांबते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अतिक्षारयुक्त- निरुपयोगी खारपड होण्याच्या क्रियेचा वेगही तेथील खारफुटींमुळे कमी होतो. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यास जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशांत मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते, की येथील महत्त्वाचे पाणथळ प्रदेश हे दख्खनच्या पठारावरील नद्या-उपनद्या, धरणांमागील जलाशय आणि पाझर तलावांच्या आसपासच्या परिसंस्था आहेत. यामुळे भूजलाचे पुनर्भरण आणि पाझर यात मोलाची मदत होते.बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांना या पाणथळ प्रदेशांतच अधिवास मिळतो. प्लवर सारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी- इबिस, चमचा, रोहित- फ्लेमिंगो हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा दुवा असतात. आज पाणथळ प्रदेशांकडे वाया गेलेली जमीन म्हणूनच पाहिले जाते, पण जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन त्यांचे जतन करून, तिथला कचरा दूर करून त्यांचा सजगतेने वापर करणे गरजेचे आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## जमीन घोटाळा : फडणवीसांचे दाखल झालेल्या FIR बाबत स्पष्टीकरण

# पार्थ जमीन खरेदी प्रकरणात अभय

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील ४० एकरांचा भूखंड विकत घेतल्यानंतर राजकीय आरोप होत आहेत. या प्रकरणाच्या चौकशीसाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.**

### पार्थ पवारांचे नाव का नाही




### समांतर चौकशी सुरू आहे

दोन्ही पक्षांनी ही रजिस्ट्री रद्द करावी असा अर्ज केला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जे पैसे भरावे लागतात, कारण रजिस्ट्री रद्द करायची असेल तरी पैसे भरावे लागतात. त्या संदर्भातील नोटीस त्यांना पाठवण्यात आली आहे. हे जरी झालं तरी जी क्रिमीनल केस दाखल झाली आहे, ती याने संपणार नाही. या प्रकरणात ज्या अनियमितता आहेत, त्याला जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर पुढील कारवाई होईल.”याबरोबर अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अंतर्गत समितीची जी समांतर चौकशी सुरू आहे

दरम्यान अमेडिया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीने महार वतन असलेल्या ४० एकर जमिनीची खरेदी केल्याचे बोलले गेले. या खरेदी व्यवहाराचे कोट्यवधीचे मुद्रांक शुल्कही भरलेले नाही, असा आरोप करण्यात आला. कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के भागीदारी असताना त्यांना गुन्ह्यातून वगळण्यात आल्याचा आरोप विरोधक करत आहेत. दरम्यान या प्रकरणावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले , “माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, हा जो करार त्यांनी केला होता. त्यामध्ये पैशाचे देवाणघेवाण बाकी होती, पण रजिस्ट्री पूर्ण झाली होती. दोन्ही पक्षांनी ही रजिस्ट्री रद्द करावी असा अर्ज केला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जे पैसे भरावे लागतात, कारण रजिस्ट्री रद्द करायची असेल तरी पैसे भरावे लागतात. त्या संदर्भातील नोटीस त्यांना पाठवण्यात आली आहे. हे जरी झालं तरी जी क्रिमीनल केस दाखल झाली आहे, ती याने संपणार नाही. या प्रकरणात ज्या अनियमितता आहेत, त्याला जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर पुढील कारवाई होईल.”याबरोबर अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अंतर्गत समितीची जी समांतर चौकशी सुरू आहे, त्याअंतर्गत चौकशी करून त्याचा अहवाल एक महिन्यात घेऊ, त्यामध्ये याची किती व्याप्ती आहे. यामध्ये अजून कोण-कोण आहे याची महिती मिळेल, त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. पार्थ पवारांना अभय दिला आणि बाकीच्यांवर गुन्हे दाखल केले गेले असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. याबद्दल देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, “ज्यांना एफआयआर हा काय असतो हे समजत नाही असेच लोकं अशा प्रकारचा आरोप करू शकतात. एफआयआर दाखल करत असताना ज्या एक्सप्रेस्ड पार्टीज (करारात सहभागी असलेले लोक) असतात त्यांच्यावर एफआयआर दाखल होतो. त्या कंपनीचे ऑथराइज्ड सिग्नेटरी आहेत, त्यांच्यावरच एफआयआर दाखल होतो, तो एफआयआर दाखल झाला आहे.”जेव्हा एखादा एफआयआर होतो, तेव्हा त्यामध्ये ज्यांनी सही केली ते, ज्यांनी विक्री केली ते, ज्यांनी चुकेचे रजिस्ट्रेशन केलं ते अशा सर्वावर एफआयआर दाखल झालेला आहे. चौकशी दरम्यान अजूनही कोणाची नावे आली, कोणाचा संबंध आला तर त्यांच्यावरही कारवाई होत असते. आता जो एफआयआर केला आहे, त्यामध्ये कोणालाही डावललेलं नाही. नियमानुसार ऑथराइज्ड सिग्नेटरी, नियमानुसार पॉवर ऑफ अटॉर्नी होल्डर हे एफआयआरचे जबाबदार असतात, त्यांना जबाबदार धरलं आहे,” असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.दरम्यान अमेडिया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीने महार वतन असलेल्या ४० एकर जमिनीची खरेदी केल्याचे बोलले गेले. या खरेदी व्यवहाराचे कोट्यवधीचे मुद्रांक शुल्कही भरलेले नाही, असा आरोप करण्यात आला. कंपनीत पार्थ पवार यांची ९९ टक्के भागीदारी असताना त्यांना गुन्ह्यातून वगळण्यात आल्याचा आरोप विरोधक करत आहेत. दरम्यान या प्रकरणावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले , “माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, हा जो करार त्यांनी केला होता. त्यामध्ये पैशाचे देवाणघेवाण बाकी होती.

# नागपूर जिल्हा काँग्रेसमध्ये गटबाजी!

## इच्छुकांच्या मुलाखतीवर प्रदेशाध्यक्षांचा आक्षेप...

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती घेण्यासाठी नागपूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अश्विन बैस यांनी बोलावलेली बैठकच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अवैध ठरवली. बैस यांनी सुनील केदार यांच्या पुढाकारानेच इच्छुकांच्या मुलाखतीचा कार्यक्रम शुक्रवारी जाहीर केला होता.**



### सपकाळ यांनी अवैध ठरवली बैठक

इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या समजते.नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती घेण्यासाठी नागपूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अश्विन बैस यांनी बोलावलेली बैठकच प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अवैध ठरवली.

माजी मंत्री सुनील केदार यांच्या पुढाकाराने इच्छुकांच्या मुलाखतीचा कार्यक्रम शुक्रवारी जाहीर करण्यात आला होता. या बैठकीची सूचना नागपूरचे निरीक्षक माजी आमदार वीरेंद्र जगताप यांना देण्याला आली नव्हती.

याशिवाय पक्षाच्या प्रोटकॉलनुसार वरिष्ठ पदाधिकारी, माजी आमदार, पदाधिकारी, माजी अध्यक्ष तसेच पक्षाने जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी नेमलेल्या जिल्हा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनाही या बैठकीला बोलावले नव्हते.या सगळ्या वादामुळेच गटबाजीला खतपाणी घालू नका असा निरोप देऊन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नागपूरचे निवडणूक निरीक्षक माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या मार्फत बैठक रद्द करण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्यानंतरही इच्छुकांच्या मुलाखती घेऊन स्थानिक नेत्यांनी प्रदेशाध्यक्षांचा आदेश धुडकावून लावला. यावरून निवडणुकीपूर्वीच काँग्रेसमध्ये गटबाजी उफाळून आली असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुनील केदार, रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक या मोजक्या तसेच केदारांच्या समर्थकांनाच बोलावून इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार होत्या. याची माहिती मिळताच काही पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्षांकडे तक्रार केली. त्यांनी याची तत्काळ दखल घेतली. त्यांनी तातडीने नागपूर ग्रामीणचे निरीक्षक वीरेंद्र जगताप यांच्यासोबत उदय मेघे आणि अशोकराव बोबडे यांना नागपूरला पाठवले. मेघे आणि बोबडे यांनी ग्रामीण काँग्रेसच्या कार्यालयात सुरू असलेल्या बैठकीत येऊन ही बैठक अवैध असल्याचे स्पष्टपणे सांगितले. सोबतच अशा परस्पर, नियमबाह्य बैठका घेऊन गटबाजीला खतपाणी घालू नका, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना डावलू नका हा प्रदेशाध्यक्षांचा निरोपही बैठकीत उपस्थित असलेल्या स्थानिक नेत्यांना कळविला. या नंतर ते निघून गेले.

## नेमका प्रकार काय?

## खासदाराच्या खात्यातून पळवले ५५ लाख रुपये

# बँकेतही पैसे सुरक्षित नाहीत?

## राकेश सिन्हा यांच्यावर गंभीर आरोप



। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**तृणमूल काँग्रेसचे नेते आणि लोकसभा खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या बँक खात्यातून सायबर गुन्हेगारांनी कथितपणे सुमारे ५५ लाख रुपये पळवल्याची बाब समोर आली आहे. सायबर गुन्हेगारांनी बनावट कागदपत्रांच्या मदतीने त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)च्या खात्याचा एक्सेस मिळवल्याचे सांगितले जात आहे. बॅनर्जी यांनी या फसवणुकीबद्दल ब्रँच मॅनेजरने माहिती दिल्याचे वृत्त आनंदबाझारने दिले आहे.**

फसवणूक करणाऱ्यांनी बॅनर्जी यांचा फोटो वापरला आणि त्यांचे कॉन्टॅक्ट डिटेल्स बदलून त्यांच्या खात्याचा एक्सेस मिळवला आणि त्यानंतर पैसे हस्तांतरित केले.मीडिया रिपोर्टनुसार, जेव्हा बॅनर्जी आसनसोल दक्षिणचे आमदार होते, तेव्हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विधानसभेच्या शाखेत हे खाते उघडण्यात आले होते.आमदार म्हणून त्यांना मिळालेले सर्व भत्ते याच खात्यात जमा झाले होते. या खात्यातून काही दिवसांपासून कोणतेही व्यवहार झाले नव्हते, त्यामुळे हे खाते निष्क्रिय झाले होते.न्यूज१८ ने दिलेल्या वृत्तानुसार फसवणूक करणाऱ्यांनी बॅनर्जी यांच्या खात्याचे KYC डिटेल्स अपडेट करण्यासाठी बनावट पॅन कार्ड आणि आधार कार्ड वापरले. त्यांनी बॅनर्जींच्या खात्याशी जोडलेला नोंदणीकृत मोबाईल नंबर देखील बदलला, ज्यामुळे त्यांना खात्याचा पूर्ण ॲक्सेसन मिळाला. “जर तुम्ही बँकेत पैसे ठेवले तर ते गुन्हेगार पळवतील आणि पैसे घरी ठेवल्यास ते नरेंद्र मोदी घेऊन जातील,” अशी प्रतिक्रिया बॅनर्जी यांनी दिल्याचे वृत्त आनंदबाजारने दिले आहे. यादरम्यान कोलकात्याच्या सायबर गुन्हे विभागाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.तृणमूल काँग्रेसचे नेते आणि लोकसभा खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या बँक खात्यातून सायबर गुन्हेगारांनी कथितपणे सुमारे ५५ लाख रुपये पळवल्याची बाब समोर आली आहे.

सायबर गुन्हेगारांनी बनावट कागदपत्रांच्या मदतीने त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)च्या खात्याचा एक्सेस मिळवल्याचे सांगितले जात आहे. बॅनर्जी यांनी या फसवणुकीबद्दल ब्रँच मॅनेजरने माहिती दिल्याचे वृत्त आनंदबाझारने दिले आहे. फसवणूक करणाऱ्यांनी बॅनर्जी यांचा फोटो वापरला आणि त्यांचे कॉन्टॅक्ट डिटेल्स बदलून त्यांच्या खात्याचा एक्सेस मिळवला आणि त्यानंतर पैसे हस्तांतरित केले.मीडिया रिपोर्टनुसार, जेव्हा बॅनर्जी आसनसोल दक्षिणचे आमदार होते, तेव्हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विधानसभेच्या शाखेत हे खाते उघडण्यात आले होते.आमदार म्हणून त्यांना मिळालेले सर्व भत्ते याच खात्यात जमा झाले होते. या खात्यातून काही दिवसांपासून कोणतेही व्यवहार झाले नव्हते, त्यामुळे हे खाते निष्क्रिय झाले होते.न्यूज१८ ने दिलेल्या वृत्तानुसार फसवणूक करणाऱ्यांनी बॅनर्जी यांच्या खात्याचे KYC डिटेल्स अपडेट करण्यासाठी बनावट पॅन कार्ड आणि आधार कार्ड वापरले. त्यांनी बॅनर्जींच्या खात्याशी जोडलेला नोंदणीकृत मोबाईल नंबर देखील बदलला, ज्यामुळे त्यांना खात्याचा पूर्ण ॲक्सेसन मिळाला. “जर तुम्ही बँकेत पैसे ठेवले तर ते गुन्हेगार पळवतील आणि पैसे घरी ठेवल्यास ते नरेंद्र मोदी घेऊन जातील,” अशी प्रतिक्रिया बॅनर्जी यांनी दिल्याचे वृत्त आनंदबाजारने दिले आहे. यादरम्यान कोलकात्याच्या सायबर गुन्हे विभागाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

### काही दिवसांपासून व्यवहार

फसवणूक करणाऱ्यांनी बॅनर्जी यांचा फोटो वापरला आणि त्यांचे कॉन्टॅक्ट डिटेल्स बदलून त्यांच्या खात्याचा एक्सेस मिळवला आणि त्यानंतर पैसे हस्तांतरित केले.मीडिया रिपोर्टनुसार, जेव्हा बॅनर्जी आसनसोल दक्षिणचे आमदार होते, तेव्हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विधानसभेच्या शाखेत हे खाते उघडण्यात आले होते.आमदार म्हणून त्यांना मिळालेले सर्व भत्ते याच खात्यात जमा झाले होते. या खात्यातून काही दिवसांपासून कोणतेही व्यवहार झाले.

# शांभवी चौधरींनी दोन वेळा मतदान केलं?

## व्हिडीओत दाखवली दोन्ही हातांच्या बोटावरील शाई; बिहारमध्ये खळबळ

। मुंबई ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. ६ नोव्हेंबर रोजी पहिल्या टप्प्यातील १२१ जागांसाठी मतदान पार पडले. मतदान होण्याच्या एक दिवस आधी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन हरियाणा राज्यातील विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या गडबडीबाबत मोठे आरोप केले.**

त्यानंतर आता बिहारच्या निवडणुकीत एका खासदाराने दुबार मतदान केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) एनडीएचा मित्रपक्ष आहे. या पक्षाच्या खासदार शांभवी चौधरी यांनी बुधवारी मतदान केल्यानंतर दोन्ही हातांच्या बोटांना शाई असल्याचे दाखवले. शांभवी चौधरी यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर बराच व्हायरल झाला. एएनआय वृत्तसंस्थेनेही हा व्हिडीओ शेअर केला आहे. मतदान करून बाहेर आल्यानंतर खासदार शांभवी चौधरी उजव्या हाताच्या बोटावर शाई लावली असल्याचे दाखवतात. पण इतर लोकांनी डावा हात दाखवल्याचे पाहून त्या लगेच त्यांचा डावा हात वर करतात. तेव्हा त्यांच्या डाव्या हाताच्या बोटालाही



शाई लावल्याचे दिसले.खासदार शांभवी चौधरी यांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर दोन वेळा मतदान केल्याचा आरोप केला आहे. बुधवारी एका मतदानकेंद्राबाहेर चित्रित केलेल्या व्हिडीओमध्ये २७ वर्षीय शांभवी चौधरी त्यांचे वडील आणि जद(यू) नेते अशोक चौधरी आणि आई नीता चौधरी यांच्यासह माध्यमांना मतदान केल्याची पोज देत होते. बुद्ध कॉलनीतील सेंट पॉल स्कूलमध्ये मतदान केल्यानंतर त्यांनी माध्यमांना शाई लावलेले बोट दाखवले. मात्र दोन्ही हातावरील शाई दाखवल्यामुळे आता शांभवी चौधरी यांच्यावर टीका होऊ लागली आहे.देऊन टीका केली आहे. काँग्रेससह आरजेडीनेही खासदार शांभवी चौधरी यांच्या व्हायरल व्हिडीओवर टीका केली आहे.राष्ट्रीय जनता दलाच्या प्रवक्त्या कांचन यादव यांनी एएनआयचा व्हिडीओ शेअर केला. ज्यात त्यांनी म्हटले की, हा एक वेगळ्याच स्तरावरचा घोटाळा सुरू आहे. लोजप पक्षाच्या खासदार शांभवी चौधरी यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर शाई लागली आहे. म्हणजे यांनी दोन वेळा मतदान केले. जेव्हा त्यांनी चुकीचा हात दाखवला तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना सावध केले.

### अधिकारी चूक दुरूस्त करतात

या व्हायरल व्हिडीओनंतर खासदार शांभवी चौधरी किंवा निवडणूक आयोगाने कोणतीही अधिकृत भूमिका मांडलेली नाही. मतदान करत असताना भारतात सामान्यतः मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीला शाई लावली जाते. जर मतदाराने चुकून उजवा हात पुढे केला तर संबंधित अधिकारी ती चूक दुरूस्त करतात.

# रोहनला खऱ्या आयुष्यात हवीये ‘अशी’ बायको

‘वीण दोघांतली ही तुटेना’ ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. तेजश्री प्रधान व सुबोध भावेची मुख्य भूमिका असलेल्या या मालिकेत मराठीतील इतर काही लोकप्रिय कलाकारही पाहायला मिळत आहेत. सध्या मालिकेत स्वानंदी-समर आणि रोहन-अधिरा यांचा लग्न सोहळा पाहायला मिळत आहे. अशातच आता रोहनने त्याला खऱ्या आयुष्यात कशी बायको हवी आहे याबद्दल सांगितलं आहे. ‘वीण दोघांतलीही तुटेना’ मालिकेत रोहनची भूमिका साकारणारा अभिनेता राज मोरे सध्या या मालिकेमुळे चर्चेत आहे. राज खऱ्या अर्थाने प्रसिद्धीझोतात आला ते ‘नवरी मिळे हिटलरला’ या मालिकेमुळे. त्यामध्ये त्याने महत्त्वपूर्ण भूमिका साकारलेली. याही मालिकेत अभिनेत्याच्या भूमिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या मालिकेत त्याचा म्हणजेच रोहन व अधिराचा लग्न सोहळा प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे.राजने यावेळी ‘अल्ट्रा मराठी’ला मुलाखत दिली आहे. यामध्ये मालिकेत रोहनच्या खूप अटी होत्या, पण राजच्या खऱ्या आयुष्यात होणाऱ्या बायकोसाठी काही अटी आहेत. कशी बायको हवी आहे असं विचारल्यानंतर तो म्हणाला, “माझ्या अशा काही अटी नाही, पण ती खरी असावी आणि प्रेमाच्या बाबतीत व्यक्त होणारी असावी. अधिरा जसं




खूप जीवापाड प्रेम करते, ती चांगलीच गोष्ट आहे; पण नस वगैरे कापून घेणारी इतकं पण अधिरासारखं नको. अशा फार काही अटी नाही, पण ती मनाने छान असावी ही महत्त्वाची गोष्ट आहे माझ्यासाठी.”‘वीण दोघांतलीही तुटेना’ मालिकेतील समर व स्वानंदीबरोबरच रोहन व अधिरा यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्रीसुद्धा प्रेक्षकांना आवडत असल्याचं पाहायला मिळत आहे. या मुलाखतीत रोहन व अधिरा यांनी म्हणजेच पूर्णिमा डे व राज मोरेने मालिकेचं लग्नानिमित्त गोव्यात शूटिंग सुरू असताना किती मजा केली याबद्दल सांगितलं आहे.राज म्हणाला, “खूप ऊन होतं, पण सगळ्यांनी उत्सुकतेने शूट केलं. आता ते बोलताना खूप सोपं वाटतंय, पण तसं नाहीये. पण, खूप मजा आली. सगळ्या सहकलाकारांबरोबर काम करताना मजा आली. सीनसाठी सगळेच रेडी असायचे. आम्ही खूप मासे खाल्ले. टीममध्ये सगळ्यांना मासे खायला खूप आवडतात.”‘वीण दोघांतली ही तुटेना’ ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. तेजश्री प्रधान व सुबोध भावेची मुख्य भूमिका असलेल्या या मालिकेत मराठीतील इतर काही लोकप्रिय कलाकारही पाहायला मिळत आहेत.

## डिलिव्हरी बॉय म्हणून केले काम

बॉलीवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत ज्यांनी कोणाचाही पाठिंबा नसताना स्वबळावर इंडस्ट्रीत स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं. यापैकीच एक म्हणजे अभिनेता हर्षवर्धन राणे. हर्षवर्धन सध्या त्याच्या ‘एक दिवाने की दिवानीयत’ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. परंतु, तुम्हाला माहीत आहे का त्याने अभिनयाव्यतिरिक्त एकेकाळी डिलिव्हरी बॉय म्हणून आणि कार्पेंटर म्हणूनही काम केलं होतं. हर्षवर्धन हा बॉलीवूडमधील सध्याच्या आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक आहे. त्याच्या व अभिनेत्री सोनम बाजवाच्या ‘एक दिवाने की दिवनीयत’ या चित्रपटाला प्रेक्षक भरभरून प्रतिसाद देत आहेत. महत्त्वाचं म्हणजे हर्षवर्धनचा हा चित्रपट २१ ऑक्टोबरला प्रदर्शित झाला असून तो याच दिवशी प्रदर्शित झालेल्या आयुष्मान खुरानाच्या ‘थामा’लाही टक्कर देताना दिसतोय. हर्षवर्धनच्या या चित्रपटाने आतापर्यंत ‘सॅकनिल्क’च्या वृत्तानुसार जवळपास ७१.३५ कोटींचा गल्ला जमावला आहे. तर आयुष्मान खारानाच्या थामाने १२६.९५ इतके कोटी कमावले.

## दियाचा प्रोजेक्ट काय ?

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे. दिया मिर्झाची ‘पन्हं’ या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. “हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..’पन्हं’”, असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. “या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे,” असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील ‘पन्हं’ या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. “एका दमदार टीमबरोबर नवीन काम”, असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.दरम्यान, दिया मिर्झाची ही शॉर्ट फिल्म काय आहे?



## ‘घटस्फोटित’म्हणून ‘बिग बॉस’मध्ये घेतलं

‘बिग बॉस’ हा टेलिव्हिजनवरील एक लोकप्रिय रिॲलिटी शो आहे. हिंदी आणि मराठीसह हा शो इतर काही भागांतही होतो. हिंदी ‘बिग बॉस’मध्ये आजवर अनेक कलाकारांनी सहभाग घेतला आहे. ‘बिग बॉस’ शोमध्ये सहभागी झाल्यानंतर अनेकांना पैसा आणि प्रसिद्धी मिळते. अशातच या शोच्या एका स्पर्धकानं फक्त पैशांसाठीच हा शो केला असल्याचं म्हटलं आहे. अभिनेत्री डेलनाज ईराणी या ‘बिग बॉस’च्या सहाव्या सीझनमध्ये सहभागी झाल्या होत्या. त्यांनी सांगितलं की, हा शो करण्यामागे त्यांचा एकच हेतू होता, तो म्हणजे पैसे कमावणे. तसंच शोमध्ये प्रवेश करताच पहिल्या २० सेकंदांतच त्यांना कळलं होतं की, त्यांना शोमध्ये त्यांच्या टॅलेंटसाठी नाही तर घटस्फोटामुळे बोलावलं गेलं आहे.हिंदी रश या माध्यमाशी बोलताना डेलनाज यांनी आपले बिग बॉसमधील अनुभव सांगितले. त्या म्हणाल्या, कायम माझ्या पाठीशी होतं. पण, मी कायम स्वाभिमानानं जगली आहे. आई-बाबांनी मला सर्वकाही दिलं, पण जेव्हा आपण काम करायला लागतो, तेव्हा कोणावर अवलंबून राहावं असं वाटत नाही. मग तो नवरा असो किंवा वडील. अभिनय ही माझी आवड होती, पण हळूहळू माझा आवडता व्यवसाय बनला आणि मग याच क्षेत्रात मी कधी स्वतःच्या पायांवर उभी राहिले हे मलाच कळलं नाही.”यानंतर त्यांनी सांगितलं

## खुशबू तावडेने दाखवली कोल्हापुरातील घराची झलक

खुशबू तावडे मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने आजवर हिंदी मराठी दोन्ही भाषेत विविध माध्यमांत काम केलं आहे. अभिनेत्री सोशल मीडियावरही खूप सक्रिय असते आणि अनेकदा यामार्फत ती तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी शेअर करत असते. खुशबूचे स्वत:चे यूट्यूब चॅनेलही आहे, ज्यामार्फत ती अनेकदा व्लॉग करत असते. अशातच अभिनेत्रीने नुकताच नवीन व्हिडीओ तिच्या चॅनेलवर पोस्ट केला आहे. हा व्हिडीओ विशेष आहे, कारण अभिनेत्रीने यामधून पहिल्यांदाच तिच्या सासरची म्हणजेच कोल्हापुरातील घराची झलक दाखवली आहे.खुशबूने या व्हिडीओतून तिचा नवरा म्हणजेच अभिनेता संग्राम साळवीच्या कोल्हापुरातील घराची झलक दाखवली आहे. यावेळी ती सहकुटुंब कोल्हापुरात गेली असून ती तिच्या सासरी रमल्याचं तिने शेअर केलेल्या व्हिडीओमधून दिसतं.खुशबूने या व्हिडीओमधून तिच्या सासरच्या घरातील म्हशींचा गोठा दाखवला आहे. यासह त्यांच्या घरात संग्रामचा मोठा फोटो असल्याचं दिसतं. खुशबूनं सकाळच्या नाश्त्याला खास कोल्हापुरी मिसळवर ताव मारल्याचं दिसतं. यावेळी तिने तिच्या सासरी असलेल्या अंबाबाईच्या देवळाचीही झलक दाखवली. यासह तिने कोल्हापुरातील बाळूमामाच्या मंदिराचीही झलक दाखवली असून ती तिथे तिच्या कुटुंबीयांसह दर्शनाला गेल्याचं तिने यातून म्हटलं आहे.खुशबू व संग्राम मंदिरात गेलेले असताना तिथे त्यांच्या गावातील अनेक जण त्यांच्याबरोबर फोटो काढताना तिने शेअर केलेल्या या व्हिडीओमधून पाहायला मिळतं. खुशबू, संग्राम व तिची दोन मुलं राघव आणि राधी यांच्याबरोबर सासरी गेल्याचं या व्हिडीओमधून दिसतं.खुशबू अनेकदा सोशल मीडियामार्फत व तिच्या व्लॉगमार्फत तिच्या आयुष्यातील घडामोडी, घरातील कार्यक्रम याबद्दलची माहिती तिच्या चाहत्यांसह शेअर करत असते. दरम्यान, खुशबू तावडेच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर ती शेवटची ‘झी मराठी’वरील ‘सारं काही तिच्यासाठी’ या मालिकेतून झळकलेली.

तो



## आरसीबीला गेलच्या बॅटिंगने हात दिला

## युनिव्हर्सल बॉस ख्रिस गेल आरसीबीला कसा गवसला?

# कानामागून आला आणि हिरो झाला

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल स्पर्धेतल्या लोकप्रिय संघांपैकी एक असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाची मालकी बदलणार असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. असं झाल्यास आरसीबीचा चेहरामोहरा बदलून जाईल. यंदाच्या वर्षी रजत पाटीदारच्या नेतृत्वात आरसीबीचं जेतेपदाचं स्वप्न पहिल्यांदा प्रत्यक्षात साकारलं. विराट कोहलीचा संघ अशी या संघाची ओळख आहे. या पार्श्वभूमीवर १७ वर्ष आयपीएलचा अविभाज्य भाग असलेल्या संघाच्या वाटचालीचा घेतलेला आढावा.**

## ख्रिस गेलचं वादळ घोंघावलं



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि ख्रिस गेल हे एक अनोखं समीकरण आहे. मैदानात चौफेर फटकेबाजी करत गेल एकहाती सामन्याचं चित्र पालटवत असे. मात्र हाच गेल आरसीबीच्या ताफ्यात आला तरी कसा? याची गोष्ट रंजक आहे.२०११ हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडे डर्क नॅन्स हा डावखुरा वेगवान गोलंदाज होता. ऑस्ट्रेलियाचा हा उंचपुरा खेळाडू आरसीबीच्या योजनांचा महत्त्वाचा भाग होता. मात्र दुसऱ्याच सामनादरम्यान नॅन्स दुखापतग्रस्त झाला. नियमानुसार नॅन्सच्या मानधनापेक्षा जास्त रक्कम देऊन बदली खेळाडू घेण्याला परवानगी नव्हती. गोलंदाज दुखापतग्रस्त झाल्याने आरबीसीचा संघ तशाच स्वरुपाचा गोलंदाज घेईल अशी शक्यता होती मात्र त्यांनी चाहत्यांना धक्का देत ख्रिस गेलला निमंत्रण दिलं.गेल इच्छुक असण्याबरोबरीने त्याला वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने परवानगी देणं आवश्यक होतं. याच काळात वेस्ट इंडिज-पाकिस्तान मालिका होणार होती. या मालिकेसाठी उपलब्ध नसल्याचं गेलने वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाला कळवलं होतं.

गेल एका दुखापतीतून सावरत असल्याने त्याने हा निर्णय घेतल्याचं बोर्डाला वाटलं.

प्रत्यक्षात गेल आयपीएल खेळणार होता. बोर्डातर्फे रिहॅब प्रक्रियेचा भाग असूनही गेलने आयपीएल खेळणार यासंदर्भात त्याने कळवलं होतं.आधीच्या तीन हंगामात कोलकाता नाईट रायडर्स संघातर्फे खेळताना गेलने १४१.५९च्या स्ट्राईकरेटने ४६३ धावा केल्या होत्या. एवढी उत्तम कामगिरी असूनही गेलला २०११ लिलावात कोणी खरेदी केलं नाही. गेलची बेसप्राईज .. इतकी होती. या काळात वेस्ट इंडिजच्या पाकिस्तानविरुद्धच्या मालितेत तो खेळेल अशी चिन्हं होती. पूर्ण हंगाम उपलब्ध नसल्यामुळे संघांनी गेलच्या नावाचा विचार केला नाही. नॅन्स दुखापतग्रस्त झाल्यानंतर आरसीबी संघव्यवस्थापनाने गेलशी संपर्क केला. तांत्रिक सोपस्कार पूर्ण केल्यानंतर गेल आरसीबीकडून खेळण्यासाठी सज्ज झाला. योगायोग म्हणजे गेलने त्याच्या आधीच्याच संघाविरुद्ध म्हणजेच कोलकाता नाईट रायडर्सचविरुद्ध आरसीबीसाटी पदार्पण केलं. कोलकाताने १७१ धावांची मजल मारली. गौतम गंभीरने ४८ तर युसुफ पठाणने ४६ धावा केल्या. जॅक कॅलिसने ४० धावा केल्या. बंगळुरूने गेलच्या वादळी शतकाच्या बळावर ११ चेंडू आणि ९ विकेट्स राखून सामना जिंकला. गेलने आपली ताकद सिद्ध करत १० चौकार आणि ७ षटकारांसह ५५ चेंडूत नाबाद १०२ धावांची खेळी केली. गेललाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. किंग्ज इलेव्हन पंजाबविरुद्ध बंगळुरूने २०५ धावांचा डोंगर उभारला. गेलने अवघ्या ४९ चेंडूत १० चौकार आणि ९ षटकारांसह १०७ धावांची तडाखेबंद खेळी केली. प्रत्युत्तरादाखल खेळताना पंजाबने १२० धावा केल्या. बंगळुरूतर्फे श्रीनाथ अरविंदने ४ तर गेलने ३ विकेट्स पटकावल्या. शतक आणि ३ विकेट्स अशा अष्टपैलू कामगिरीसाठी गेललाच सामनावीर पुरस्कार देण्यात आला. बदली खेळाडू म्हणून दाखल झालेल्या गेलने हंगामात सर्वाधिक धावा करत ऑरेंज कॅपचा मान पटकावला. गेलने १२ सामन्यात १८३.१३च्या स्ट्राईकरेटसह ६०८ धावा केल्या. यामध्ये २ शतकं आणि ३ अर्धशतकांचा समावेश केला. आरसीबीने त्या हंगामात फायनलपर्यंत धडक मारली होती. फायनलमध्ये मात्र रवीचंद्रन अश्विनच्या फिरकीसमोर त्याला भोपळाही फोडता आला नाही. बदली खेळाडू म्हणून का होईना पण मान देणाऱ्या आरसीबीसाठी गेलने पुढच्या हंगामात धुमाकूळ घातला. २०१२ मध्ये गेलची बॅट तळपली आणि त्याने १५ सामन्यात १६०.७४च्या स्ट्राईकरेटने ७३३ धावांचा डोंगर उभारला. यामध्ये १ शतक आणि ७ अर्धशतकांचा समावेश होता. सलग दुसऱ्या वर्षी गेलला ऑरेंज कॅप पुरस्काराने गौरवण्यात आलं. आरबीसीसाठी तिसऱ्या हंगामातही गेलचं वादळ घोंघावलं. २०१३ मध्ये गेलची ऑरेंज कॅप थोडक्यात हुकली पण त्याने धावांची टांकसाळ उघडलीच. गेलने २०१३ हंगामात १६ सामन्यात १५६.२९च्या स्ट्राईकरेटने ७०८ धावा केल्या. यामध्ये १ शतक आणि ४ अर्धशतकांचा समावेश होता. नाही. ९ सामन्यात त्याने १०६च्या स्ट्राईकरेटने १९६ धावा केल्या. २०१५ हंगामात गेलने १४ सामने खेळत १४४च्या स्ट्राईकरेटने ४९१ धावा केल्या.

### युसुफ पठाणने ४६ धावा केल्या

यामध्ये एक शतक आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. २०१६ हंगामात गेलचं वादळ ओसरलं. त्याने १० सामन्यात २२७ धावा केल्या. यामध्य २ शतकं आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे. २०१७ मध्ये गेलने ९ सामन्यात १२२च्या स्ट्राईकरेटने २०० धावा केल्या. यामध्ये एक शतक आणि दोन अर्धशतकांचा समावेश आहे. सात हंगामानंतर मात्र आरसीबीने गेलला रिटेन केलं नाही आणि अद्भुत अशा प्रवासाची सांगता झाली.

# प्रतिका रावळसाठी ICC चा नियम बदलला!

## जय शाह यांच्या प्रयत्नांमुळे हक्काचं विनिंग मेडल मिळणार

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत भारतीय संघाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत जेतेपदाचा मान मिळवला. भारताने पहिल्यांदाच वर्ल्डकपची ट्रॉफी उंचावली. या विजयात प्रतिका रावळनेही मोलाचं योगदान दिलं होतं. पण दुखापतीमुळे संघाबाहेर झाल्यामुळे तिला विनिंग मेडल दिलं गेलं नव्हतं.**






भारतीय खेळाडूंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेण्यासाठी दिल्लीला गेले होते. त्यावेळी फोटोशूटदरम्यान अमनजोत कौरने आपलं मेडल प्रतिका रावळला दिलं होतं. पण आता बीसीसीआय अध्यक्ष जय शाह यांनी हस्तक्षेप केल्यानंतर प्रतिका रावळला आपल्या हक्काचं मेडल मिळणार आहे. नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियममध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून जेतेपदाचा मान मिळवला होता. याआधी झालेल्या सेमीफायनलच्या सामन्यात भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. या सामन्यात शफाली वर्माचा मुख्य संघात समावेश करण्यात आला होता. कारण बांगलादेशविरूद्ध झालेल्या साखळी फेरीतील शेवटच्या सामना बांगलादेशविरूद्ध पार पडला होता. या सामन्यात क्षेत्ररक्षण करत असताना प्रतिका रावळच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे तिला संघाबाहेर व्हावं लागलं होतं. अंतिम १५ संघाचा भाग नसल्यामुळे ती विनिंग मेडलसाठी पात्र ठरली नव्हती.प्रतिका रावळला विनिंग मेडल न दिल्यामुळे क्रिकेट चाहत्यांनी सोशल मीडियाद्वारे नाराजी व्यक्त केली होती

### एका सदस्याने तात्पुरते दिले होते

. चाहत्यांच्या मागणीनंतर अखेर बीसीसीआय अध्यक्ष जय शाह यांनी पुढाकार घेतला आहे. मेडल मिळवून देण्यासाठी जय शाह यांनी हस्तक्षेप केला असल्याची माहिती प्रतिका रावळने माध्यमांशी बोलताना दिली आहे. प्रतिकाने माध्यमांशी बोलताना सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भेटीदरम्यान मी जे मेडल घातले होते, ते सपोर्ट स्टाफमधील एका सदस्याने तात्पुरते दिले होते.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 8 नोव्हेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पिंपरी चिंचवडच्या वाहतूक समस्येवर

# दीर्घकालीन नियोजन आराखडा तयार करा: मंत्री चंद्रकांत पाटील

### वाहतूक व पायाभूत सुविधांबाबतची महापालिकेत घेतली आढावा बैठक

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी | पिंपरी चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या व वाढती वाहनसंख्या विचारात घेऊन भविष्यात शहरामध्ये वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी आगामी १५ वर्षांचा विचार करून महापालिकेने नियोजन आराखडा तयार करावा, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांची आढावा बैठक आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील माजी महापौर मधूकर पवळे सभागृहात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप,माजी महापौर राहूल जाधव,नितीन काळजे,माजी नगरसदस्य नामदेव ढाके, शत्रुघ्न काटे, विकास डोळस, ॲड.मोरेश्वर शेडगे, निगडी नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य वित्त व लेखा अधिकारी प्रविण जैन, शहर अभियंता मकरंद निकम, नगर रचना व विकास विभागाचे उपसंचालक किशोर गोखले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंते मनोज शेठीया, अनिल भालसाखळे, सहा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, पंकज पाटील, ममता शिंदे, राजेश आगळे, संदीप खोत, सिताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, उमेश ढाकणे, अतुल पाटील, अमित पंडित, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, किशोर ननावरे, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, राजाराम सरगर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, वाहतूक व्यवस्था, नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, आरोग्य व्यवस्था, वैद्यकीय व्यवस्था आदी सोयीसुविधांबाबत करण्यात येत असलेल्या कामाचा आढावा बैठकीमध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला.

चंद्रकांत पाटील म्हणाले, शहरातील कचरा, सांडपाणी, वाहतूक असे प्रश्न सोडवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांना गती देण्यात यावी. रस्त्यांवरील खड्ड्यांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात यावे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा. फुटपाथ अतिक्रमणमुक्त राहतील, यासाठी सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या. पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाढणारी वाहनसंख्या लक्षात घेऊन वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. भविष्यात ही समस्या गंभीर होऊ नये, यासाठी पुढील १५ ते २० वर्षांचा विचार करून वाहतूक नियोजन आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. तसेच तात्काळ उपाययोजनांसाठी पोलीस विभागाशी समन्वय साधून सिग्नल दुरुस्तींसह वाहतूक नियोजनासाठी इतर उपाययोजना करण्यास प्राधान्य द्यावे, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

## आ. महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

### सोसायटी फेडरेशनचा पुढाकार : अध्यक्ष संजीवन सांगळे यांची माहिती

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आमदार महेश लांडगे यांच्या 50 व्या वाढदिवसानिमित्त चिखली–मोशी–चऱ्होली–पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनतर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, 9 नोव्हेंबर रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत भूमी सिल्व्हेरिओ सोसायटी, लक्ष्मी चौक, मोशी येथे होणार आहे. पिंपरी चिंचवड शहरासह राज्यभरात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने या पार्श्वभूमीवर फेडरेशनने हा सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.**

पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी सांगितले की, “सध्या विविध रुग्णालयांमध्ये रक्ताची कमतरता निर्माण झाली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येऊन रक्तदान केल्यास अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात.

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त फेडरेशन तर्फे हे शिबिर आयोजित केले असून, शहरातील सर्व सोसायटीधारकांनी सहभागी होऊन या सामाजिक कार्यात हातभार लावावा,” असे आवाहन त्यांनी केले.

रक्तदान शिबिरासाठी शहरातील विविध सोसायट्यांमधील नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, या उपक्रमाद्वारे सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सेवाभाव वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न आयोजकांनी केला आहे.



## पिंपरी-चिंचवड पोलिस वाहतूक विभागाच्या वतीने

# ट्रॅफिकबडी चॅटबॉटविषयी संस्कृती हौसिंग सोसायटीत जनजागृती

## वाहतूक सक्षमीकरणासाठी नागरिकांचा सहभाग वाढवण्यावर भर

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड पोलिस वाहतूक विभागाच्या वतीने संस्कृती हौसिंग सोसायटीत "ट्रॅफिकबडी व्हॉट्सअॅप चॅटबॉट" या डिजिटल उपक्रमाविषयी जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश नागरिक आणि वाहतूक विभाग यांच्यातील संवाद अधिक सुलभ करणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा घडवणे हा आहे.**



सत्रात पोलिस अधिकाऱ्यांनी रहिवाशांना चॅटबॉटच्या माध्यमातून वाहतूकविषयक माहिती मिळविण्याची, नियमभंगाच्या तक्रारी नोंदविण्याची, मार्गदुरुस्ती आणि डायव्हर्जनविषयी अद्ययावत माहिती जाणून घेण्याची तसेच स्थानिक समस्यांची नोंद करण्याची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे नोंदणी व वापर प्रक्रिया दाखवण्यात आली.

या वेळी सोसायटीतील रहिवाशांनी परिसरातील वाहतूक समस्यांवर आपली मते व सूचना मांडल्या. चर्चासत्रात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या उपक्रमामुळे नागरिक आणि वाहतूक पोलिस यांच्यात अधिक सुलभ संवादाची निर्मिती झाली असून जबाबदार वाहनचालकत्व व सहकार्याच्या संस्कृतीला चालना मिळाली आहे. या जनजागृती सत्रास उपपोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील अधिकारी उपस्थित होते. हौसिंग सोसायटी फेडरेशनचे श्री. सचिन लोंढे आणि श्री. विवेक देवरंकर यांची उपस्थिती विशेष ठरली. या कार्यक्रमासाठी सर्वोत्कृष्ट व्यवस्था संस्कृती सोसायटीतर्फे करण्यात आली. सोसायटीच्या सक्रिय सहभागाबद्दल व सहकार्याबद्दल वाहतूक विभागाच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

> "वाहतूक व्यवस्थापन ही केवळ पोलिसांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचा सहभाग त्यात तितकाच महत्त्वाचा आहे. ट्रॅफिकबडीसारख्या उपक्रमांमुळे नागरिक आणि वाहतूक विभाग यांच्यातील संवाद अधिक सशक्त होईल. फेडरेशनच्या वतीने आम्ही अशा तंत्रज्ञानाधारित उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य करू आणि अधिकाधिक सोसायट्यांमध्ये याबाबत जनजागृती घडवू."
>
> **– सचिन लोंढे,**
> उपाध्यक्ष, सोसायटी फेडरेशन.

## प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालयात एक सूर, एक तालात देशभक्तीचा जल्लोष

## वंदेमातरम गीताचा 150 वा वर्धापन दिन : विद्यार्थी-शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित वंदेमातरम या अमर गीताच्या 150 व्या वर्धापन दिनानिमित्त आज चिंचवड येथील प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालयात देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहिला. एक सूर, एक ताल या संकल्पनेतून बाराशेहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सामुदायिक स्वरात वंदेमातरम गायन करून मातृभूमीबद्दलचे प्रेम आणि आदर व्यक्त केला.**



1875 साली लिहिलेले वंदेमातरम हे गीत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एकता आणि देशभक्तीचे प्रतीक ठरले असून आजही ते राष्ट्रगीताप्रमाणेच आदराचे स्थान राखते. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार या वर्धापन दिनानिमित्त राज्यभर विविध उपक्रम राबविले जात आहेत. महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन कमला एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य संयोजन प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी केले. या उपक्रमात क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शबाना शेख आणि डॉ. अभय पोद्दार यांनी विशेष परिश्रम घेतले. देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत झालेल्या या सोहळ्याने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमान आणि एकात्मतेचा संदेश पोहोचविला.

> "वंदेमातरम हे केवळ गीत नाही, तर आपल्या देशाच्या आत्म्याचा आवाज आहे. आजच्या पिढीने या गीतातून देशभक्ती, एकता आणि सामाजिक जबाबदारीची प्रेरणा घ्यावी, हाच या उपक्रमाचा खरा हेतू आहे."
>
> **–दीपक शहा,**
> सचिव, प्रतिभा ग्रुप.

# ग्रामीण तरुणांना उज्ज्वल भविष्याची दिशा देणारे 'आयआयबीएम'!

## विभागप्रमुख अमोल भागवत यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या वाटा दाखविणारे आणि गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे आयआयबीएम कॉलेज, चिखली (पुणे) आज हॉस्पिटॅलिटी शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळखले जाते.**




हॉटेल मॅनेजमेंट, एअरलाइन्स, शिप मॅनेजमेंट, ट्रॅव्हल्स आणि टुरिझम अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांना करिअरची दिशा देण्यात या संस्थेचे मोठे योगदान आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय वर्णेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली 'कमवा आणि शिका' या योजनेद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळते. आज या संस्थेचे अनेक विद्यार्थी देश-विदेशातील नामांकित हॉटेल्स, क्रूझ शिप्स आणि एअरलाइन कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत, ही आयआयबीएमच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची ठोस पावती आहे.

संस्थेच्या या यशस्वी वाटचालीत विभागप्रमुख अमोल भागवत सर यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. मागील १४ वर्षांपासून ते आयआयबीएममध्ये HOD म्हणून कार्यरत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक नवे शैक्षणिक आणि प्रशासकीय उपक्रम राबविण्यात आले आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. ८ नोव्हेंबर हा अमोल भागवत यांचा जन्मदिन असून, ते विद्यार्थ्यांमध्ये एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्यशैलीत शिस्त, समर्पण आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम नेहमीच दिसून येते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न आणि महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ व्होकेशनल एज्युकेशन मान्यताप्राप्त असलेले

> "ग्रामीण भागातील प्रत्येक तरुणामध्ये अमर्याद क्षमता आहे; योग्य दिशा आणि संधी मिळाली तर तोही जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवू शकतो. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये यशस्वी होण्याची ज्योत असते; आमचे काम म्हणजे त्या ज्योतीला योग्य मार्गदर्शनाचा प्रकाश देणे.
>
> – अमोल भागवत, विभागप्रमुख, आयआयबीएम.

आयआयबीएम कॉलेज आज पिंपरी-चिंचवड व चिखली परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी करिअर घडविण्याचे एक प्रमुख केंद्र बनले आहे. संस्थापक अध्यक्ष धनंजय वर्णेकर सर, प्राचार्य प्रदीप फुलकर सर, प्रशासकीय विभाग प्रमुख प्रतीक्षा डफळ मॅडम, विभाग प्रमुख अनिकेत वंजारी सर, संदीप जाधव सर तसेच सर्व शिक्षकवर्ग, विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी यांनी विभागप्रमुख अमोल भागवत सरांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# ज्येष्ठ उद्योजक अन् लायन्स क्लबचे प्रांतपाल ओमप्रकाश पेठे यांचे निधन

## सामाजिक भान असलेला उद्योजक हरवला: पिंपरी-चिंचवडमधील उद्योग क्षेत्रात हळहळ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योग क्षेत्र तसेच सामाजिक वर्तुळात आपल्या कार्याने ठसा उमटविणारे ज्येष्ठ उद्योजक आणि लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनल पुणे-नगर-नाशिकचे प्रांतपाल ओमप्रकाश पंढरिनाथ पेठे (वय ५७) यांचे आज सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने शहरात हळहळ व्यक्त होत आहे. सामाजिक भान असलेला, संवेदनशील आणि उद्योगविश्वात नावारूपास आलेला व्यक्तिमत्व हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.**



पेठे हे उद्योग क्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारे आणि सामाजिक उपक्रमांबाबत तत्पर राहणारे व्यक्ती म्हणून ओळखले जात होते. भोसरी औद्योगिक वसाहतीत त्यांनी 'एक्सपोनेशन इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी स्थापन करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. कामगारांच्या कल्याणाचा विचार, पर्यावरणपूरक उत्पादन पद्धती आणि व्यावसायिक पारदर्शकतेला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले.

लायन्स क्लबच्या माध्यमातून त्यांनी तीन जिल्ह्यांत – पुणे, नगर आणि नाशिक – अनेक सामाजिक उपक्रम राबवले. शैक्षणिक मदत, आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण मोहिमा, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी कार्यक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच पुढाकार असे. त्यांनी लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनलच्या प्रांतपाल या पदावर काम करत असताना अनेक समाजोपयोगी प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव मिळाला होता.

ओमप्रकाश पेठे हे राष्ट्रीय रेड्डी समाज, आळंदी संस्थेचे कार्याध्यक्ष म्हणूनही सक्रिय होते. तसेच लातूर जिल्हा मित्र मंडळ आणि वाल्हेकरवाडी येथील चिंतामणी मित्र मंडळ या संस्थांचे सल्लागार म्हणून त्यांनी मार्गदर्शन केले. समाजातील विविध घटकांना जोडणारे, विकासात्मक दृष्टीकोन असलेले आणि नेहमीच हसतमुख राहणारे म्हणून त्यांची वेगळी ओळख होती.

त्यांच्या निधनाने औद्योगिक क्षेत्रासह सामाजिक संस्थांमध्ये शोककळा पसरली आहे. सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक श्रमिक गोजमगुंडे यांचे ते मेहुणे होत. त्यांच्या मागे पत्नी श्रद्धा पेठे (सामाजिक कार्यकर्त्या), मुलगा स्वराज (उद्योजक) आणि कन्या श्रावणी (चार्टर्ड अकाउंटंट) असा परिवार आहे.

आज सायंकाळी निगडी येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे कुटुंबीयांनी कळवले आहे. उद्योग क्षेत्र, लायन्स क्लबचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने अंत्यसंस्कारासाठी उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळाली आहे.

त्यांच्या जाण्याने पिंपरी-चिंचवड शहराने एक समाजाभिमुख उद्योजक आणि जनसेवक गमावला आहे, अशी भावना उद्योग व सामाजिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे.




Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

# IIBM: Guiding Rural Youth Towards a Bright Future

## Heartfelt Wishes Pour in on the Birthday of HOD Amol Bhagwat

Mahaenews
Pimpri- Chinchwad :
Special Correspondent

The International Institute of Business and Management (IIBM College), Chikhali (Pune) has been illuminating the path of success for rural students for the past 18 years, earning a reputation as one of the leading and most trusted institutions in the field of hospitality education.




> "Every young person from rural areas possesses immense potential. With the right direction and opportunities, they too can make their mark globally. Each student has a spark of success within; our duty is to guide that spark with the light of knowledge."
>
> —**Amol Bhagwat,** Head of Department, IIBM

The institute has played a major role in helping students build careers in Hotel Management, Airlines, Ship Management, Travel, and Tourism. Under the guidance of Founder-President Dhananjay Varnekar, IIBM runs the "Earn and Learn" scheme, which enables students from rural areas to pursue education along with financial independence. Today, many IIBM alumni are working in renowned hotels, cruise ships, and airlines across India and abroad, proving the institute's commitment to quality education.

The contribution of Head of Department (HOD) Amol Bhagwat in this successful journey has been remarkable. For the past 14 years, he has been serving as the HOD at IIBM, leading numerous academic and administrative initiatives. His dedication and innovative leadership have earned him multiple awards and recognition in the education sector.

November 8 marks Amol Bhagwat's birthday, and he is regarded as an inspirational figure among students. His work ethic reflects discipline, dedication, and deep affection for his students. Affiliated with Savitribai Phule Pune University and recognized by the Maharashtra State Board of Vocational Education, IIBM College has become a major hub for rural youth in Pimpri-Chinchwad and Chikhali, guiding them towards successful careers.

Founder-President Dhananjay Varnekar, Principal Pradeep Phulkar, Administrative Head Pratiksha Dafal, Department Heads Aniket Wanjari and Sandeep Jadhav, along with all the faculty, students, and staff members, extended their warm birthday wishes to Amol Bhagwat.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।
। दि. 8 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शतप्रतिशत भाजपा : आमदार महेश लांडगे यांच्यावर पुणे जिल्ह्यात 6 तालुक्यांतील निवडणुकांची जबाबदारी!

# मुख्यमंत्री फडणवीस यांचा मास्टरस्ट्रोक!

## उत्तर पुणे जिल्हा निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीने "शतप्रति:शत" चा नारा दिला असून, जिल्ह्यातील उत्तर भागात असलेल्या 6 तालुक्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या "निवडणूक प्रमुखपदी" आमदार महेश लांडगे यांची नियुक्ती केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीसह संभाव्य प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) ला आव्हान देण्यासाठी स्थानिक पातळीवर 'हुकमी एक्का' बाहेर काढला आहे.**

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने "जिल्हा निवडणूक प्रमुख" आणि प्रभारी यांची नियुक्ती घोषीत केली. भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक रचनेमध्ये पुणे जिल्ह्याचे विभाजन दोन भागांत आहे. उत्तर पुणे जिल्हा (मावळ) आणि दक्षिण पुणे जिल्हा (बारामती) तसेच, पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र भाजपा संघटनेत जिल्हा म्हणून संबोधले जाते. प्रशासकीय संरचनेमध्ये पुणे जिल्ह्यात एकूण 14 तालुके आहेत. 14 नगरपरिषदा, 2 नगरपंचायती आहेत.

संघटनात्मक रचनेमध्ये पुणे उत्तर जिल्हा (मावळ) मध्ये लोणावळा, तळेगाव, चाकण, राजगुरूनगर शिरुर, आळंदी, जुन्नर अशा 7 नगरपरिषदा आहेत. मंचर आणि वडगाव या दोन नगरपंचायती आहे. तसेच आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, शिरुर, हवेली या 6 पंचायत समिती आहेत. याचप्रमाणे आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, शिरुर, हवेली या 6 तालुक्यांचा समावेश पुणे उत्तर जिल्हा (मावळ) आहे. तसेच, पंचायत समितीचे एकूण 76 गण आणि जिल्हा परिषदेचे एकूण 41 गट या जागांवर होणाऱ्या निवडणुकीची जबाबदारी आमदार महेश लांडगे यांच्याकडे "निवडणूक प्रमुख" म्हणून सोपवली आहे.

विशेष म्हणजे, 2017 मध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या सोबतीने आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेत सत्ता खेचून आणली होती. किंबहुना, राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये लांडगे यांनी 2014 पासून राष्ट्रवादीशी दोन हात करण्याची भूमिका ठेवली. तसेच, 2019 आणि 2024 च्या विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आव्हान देत निवडणूक जिंकली होती. महाविकास आघाडी सत्तेच्या काळात विरोधी पक्षात असतानाही तत्कालीन विरोधी पक्षनेते आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार लांडगे यांना मोठी ताकद दिली. उत्तर पुणे जिल्ह्याची जबाबदारी असली, तरी भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार म्हणून महेश लांडगे यांचा पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीही निर्णायक "रोल" राहणार आहे.

दुसरीकडे, दक्षिण पुणे जिल्हा (बारामती) ची जबाबदारी आमदार राहुल कुल यांच्यावर सोपवली आहे. पुणे महानगरपालिका निवडणूक प्रमुखपदी गणेश बिडकर, तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक प्रमुखपदी आमदार शंकर जगताप यांच्याकडे जबाबदारी आहे. महानगरपालिका निवडणूक प्रमुखपदांच्या नियुक्तीद्वारे संभाव्य 'गृहकलह' कमी करण्याचा प्रयत्न

### विकासाभिमूख हिंदुत्वाची व्यापक भूमिका...

*"हिंदुत्व" हा भारतीय जनता पार्टीचा आत्मा आहे. हिंदूत्वाचा पुरस्कार करीत विकासाभिमूख कारभार हा भाजपाचा अजेंडा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "विकासाभिमूख हिंदुत्व" च्या भूमिकेचा सातत्याने उल्लेख केला आहे. याच मुद्याला धरुन आमदार महेश लांडगे यांना उत्तर पुणे जिल्ह्याची जबाबदारी सोपवली आहे. कारण, पुणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यास उत्तर पुणे जिल्हा "शिवनेरी" म्हणून घोषित करावा, अशी जाहीर मागणी आमदार लांडगे यांनी केली होती. त्याला ग्रामीण भागातून प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि भूमिकेचे स्वागत झाले. त्यानंतर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात उंच पुतळा "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" उभारण्यात आला. त्यामुळे आमदार लांडगे यांची ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. 2014 पासून आतापर्यंत म्हणून "10 वर्षे विश्वासाची.. शाश्वत विकासाची" ही टॅगलाईन त्यांनी घेतली. भाजपा सत्ताकाळात "फ्युचर सिटी पिंपरी-चिंचवड" या संकल्पनेतून केलेली विकासकामे ग्रामीण भागात 'रोल मॉडेल' म्हणून प्रचार करता यावा. भारतातील सर्वात मोठी अतिक्रमण विरोधी कारवाई कुदळवाडीत झाली. बैलगाडा शर्यत बंदी उठवण्यासाठी दिलेला यशस्वी न्यायालयीन लढा यामुळे आमदार लांडगेंप्रति शेतकऱ्यांमध्ये आत्मियता आहे. विकास आणि धर्म या दोन 'लाईन'वर प्रभावीपणे आणि संतुलित चेहरा म्हणून महेश लांडगे समोर येतात. त्यांच्या मदतीने हिंदुत्वाच्या मुद्यावर हक्कांची 'व्होट बँक' अधिक सक्षम करता यावी आणि विकासाभिमूख हिंदुत्वाच्या भूमिकेतून शतप्रति:शत भाजपाचे ध्येय पूर्ण करता यावे. यासाठी भाजपाने आमदार लांडगे यांच्याकडे पिंपरी-चिंचवडसह व्यापक जबाबदारी सोपवली असावी, असे निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.*